# University of Mumbai

## परिपत्रक

No.Enrol/Elg./(2021-22) / 1508 of 2022

**विभागाच्या परिपत्रक क्र. No.Enrol/Elg./(2021-22) / 84 of 2021, दिनांक २८ मे, २०२१, नुसार मुंबई** विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व कला, वाणिज्य व विज्ञान मान्यताप्राप्त महाविद्यालयांचे प्राचार्य /संस्थाचे संचालक, संचालक, उपपरिसर (ठाणे व रत्नागिरी) यांना कळविण्यात येते की, **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासुन प्रवेश,नावनोंदणी,पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभागीय कामकाजाच्या प्रक्रीयेमध्ये खालील प्रमाणे आणखी काही बदल करण्यात आले आहेत. कृपया सर्वांनी याबाबत नोंद घेण्यात यावी.**

पदव्युत्तर विभागातर्फे पदव्युत्तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणपत्रिका तपासुन Transcript देण्यात येत होते.

**शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासुन** पदव्युत्तर सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना Transcript महाविद्यालयाकडुनच दयावेत जेणेकरून महाविद्यालयांना निकाल कक्ष, परीक्षा विभागाने दिलेल्या महाविद्यालयीन शाखानिहाय निकालाची गुण दर्शविणारी नस्ती/फाईल च्या आधारे तपासून विद्यार्थ्यांना Transcript देणे सोयीचे हाईल.

**सर्व प्राचार्यांनी याची नोंद घ्यावी व त्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून वरीलबाबतची अंमलबजावणी करावी.**

ठिकाण : मुंबई - ४०००९८
दिनांक : 24 फेब्रुवारी, २०२२

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

**University of Mumbai**

## परिपत्रक

No.Enrol/Elg./(2021-22) / 84 of 2021

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व कला, वाणिज्य व विज्ञान मान्यताप्राप्त महाविद्यालयांचे प्राचार्य /संस्थाचे संचालक, संचालक, उपपरिसर (ठाणे व रत्नागिरी) यांना कळविण्यात येते की, **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासुन प्रवेश,नावनोंदणी,पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभागीय कामकाजाच्या प्रकीयेमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात आले आहेत. कृपया सर्वांनी याबाबत नोंद घेण्यात यावी.**

१. **नावनोंदणी (Enrolment):-**
ऑनलाईन पोर्टलवर प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रवेशा करीता विद्यार्थ्यांची संगणक नावनोंदणी केल्यानंतर व सदर विद्यार्थ्यांना तात्पुरते PRN(Provisional Eligible) दिले जातात.

सदर विद्यार्थ्यांचे गुण आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून (HSC) प्राप्त झालेल्या गुण यांची योग्य ती जुळवणी करण्यात येईल व विद्यार्थ्यांना पात्र केले जाईल. सदर विद्यार्थ्याची अंतिम पात्रता केल्यानंतर स्टेटस रिपोर्ट Online उपलब्ध करून देण्यात येईल. सर्व महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थ्यांच्या अंतिम पात्रता स्टेटस रिपोर्टची नोंद घ्यावी.

२. **पात्रता (Eligibility):-**
प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रवेशा करीता पात्रता विभागातर्फे महाविद्यालयाने आवश्यक त्या कार्यवाहीची पुर्तता केल्यानंतर विद्यार्थ्यांना Online Eligible केल्यानंतर संबंधित महाविद्यालयात लिखित स्वरुपामध्ये सुध्दा सदर विद्यार्थ्याच्या पात्रतेबद्दल कळविले जात होते.

तथापी नावनोंदणी तसेच पात्रतेचे कामकाज पूर्णतः ऑनलाईन करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची पात्रता झाल्यानंतर विभागातर्फे दिले जाणारे पत्र महाविद्यालयांना देण्यात येणार नाही. सर्व महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थ्यांच्या अंतिम पात्रता ऑनलाईन स्टेटस रिपोर्टची नोंद घ्यावी.

...२...

तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (HSC) या मंडळातुन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे **संगणकीय नावनोंदणी (Enrolment)** अर्ज महाविद्यालयांनी प्रवेश, नावनोंदणी, पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभागामध्ये जमा न करता पात्रता विभागातर्फे महाविद्यालयीन क्षेत्रानुसार विद्यापीठामध्ये शिबिर /कॅम्प आयोजित करून सदर अर्जांची रॅन्डमली तपासणी केली जाईल.

संगणकीय पात्रता (Eligibility) अर्ज पूर्वीप्रमाणेच प्रवेश, नावनोंदणी, पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभागामध्ये जमा करावेत.

सर्व प्राचार्यांनी याची नोंद घ्यावी व त्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून अंमलबजावणी करावी.

ठिकाण : मुंबई - ४०००९८
दिनांक : २८ मे, २०२१

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ